क्रमांक : जमीन २६०१/१९/प्र.क्र. ४३०/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- ४-१०-२००१

विषय :- जमीन मुंबई - उपनगर जिल्हा भांडुप
मौजे घाटकोपर, किरोळ, हरियाली व कांजूरमार्ग
येथील जमीन महानगर परिवहन परियोजना यांना
मध्य रेल्वे - कुर्ला - ठाणे दरम्यान ५ वा आणि
६ वा रेल्वेमार्गाच्या उभारणीसाठी मंजूर करणेबाबत.

ज्ञापन :-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या त्यांच्या क्रमांक सी/कार्या-२ ड/भूसंपादन/मौजे घाटकोपर /किरोळ, हरियाली व कांजूर, भांडुप दिनांक२७-२-२००१ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, महानगर परिवहन परियोजना (रेल्वे) यांना मध्य रेल्वे कुर्ला - ठाणे दरम्यान ५ वा आणि ६ वा रेल्वे मार्ग उभारण्याकरीता खालील प्रमाणे परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेली एकूण ७२८७.२० चौ.मी. जमीन शासन ठराव महसूल व वन विभाग क्रमांक एलएनडी ६२/६०४४८/ब दिनांक १०-९-१९६३ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची सहाय्यक संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग यांनी निर्धारित केलेल्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे होणारी कब्जेहक्काची किंमत वसूल करून घेऊन नेहमीच्या अटी / शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटीवर मंजूर करण्यात याद्वारे शासन मंजूरी देत आहे.

अटी :- १) जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तावित जमिनीची आजच्या बाजारभावाची किंमत सहाय्यक संचालक, नगर रचना यांजकडून निश्चित करून घ्यावी व रेल्वेने शासनास भरणा केलेली रक्कम वरील रकमेतून वजा जाता उर्वरित रक्कम वसूल करावी.

२) महानगर परिवहन परियोजना प्रस्तुत जमीन त्या जमिनीवर सद्यःस्थितीत असलेल्या अतिक्रमणासहीत स्वीकारील आणि त्या सर्वांचे शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे स्वखर्चाने पुनर्वसन करण्याची जबाबदारी रेल्वे प्रशासनाची असेल

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
9 OCT 2001
१९८२६

## परिशिष्ट अ

महानगर परिवहन परियोजना (रेल्वे) याना मंजूर करण्यात आलेल्या जमिनीचा तपशील

| अ.क्र. | गाव | न.भू.क्र. | उपलब्ध क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर किरोळ | १,००४ | ४२२.६ |
| २ | घाटकोपर किरोळ | १,००४ | ३,५०४.१ |
| ३ | घाटकोपर किरोळ | १,२६१ | २,२३५.६ |
| ४ | घाटकोपर | नाला | १६०.६ |
| ५ | हरियाली | १२० | ४०४.३ |
| ६ | भांडुप | १,००३ | ६६१ |
| एकूण | | | ७,२८७.२ |

Scanned by CamScanner

२. महानगर परिवहन परियोजना यांना त्यांच्या नियोजित प्रयोजनाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या मौजे भांडुप येथील न.भू.क्र. ५०८ मधील ५५०.९ चौ.मी. जमीन मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार खेळाच्या मैदानाकरीता आरक्षित आहे. तेव्हा सदर जमीन रेल्वेस त्यांच्या नियोजित प्रयोजनाकरीता वापरात आणणे शक्य होण्यासाठी कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत आवश्यक तो फेरबदल करण्याची कार्यवाही नगर विकास विभागाने सत्वर पूर्ण करावी.

३. सोबत प्रकरणाची १ संचिका परत करण्यात येत आहे.

४. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विजय पाचकवडे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

प्रतिलिपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त, व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा)
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मूल्य निर्धारण विभाग, मुंबई
६) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
७) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collmsd@yahoo.com


क्रमांक : सी/कार्या-रडी/भूसंपादन/मौजे घाटकोपर, किरोळ,
घाटकोपर, हरियाली- भांडूप, कांजूर
दिनांक : १८/१०/२००३

प्रति,

डेप्युटी चिफ इंजिनिअर (सी)
आय. वाशी
महानगर परिवहन परियोजना (रेल्वे)
तळमजला प्लॅटफॉर्म नं. ४ चे खाली,
स्टेशन भवन, नवी मुंबई

विषय:- जमिन/मुंबई उपनगर जिल्हा
मौजे घाटकोपर, घाटकोपर- किरोळ,
हरियाली, कांजूर व भांडूप येथील शासकीय मिळकती,
मध्य रेल्वे मार्ग कुर्ला ते ठाणे दरम्यान ५ वा व ६ वा रेल्वे
मार्गासाठी हस्तांतर करणेबाबत महानगर परिवहन
परियोजना (रेल्वे) यांची विनंती.

संदर्भ:- १) या कार्यालयाचे सम क्रमांक दि. २७/२/२००१ चे पत्र
२) महसूल व वन विभाग मंत्रालय यांचेकडील ज्ञापन
क्र. जमीन-२६०१/१९/प्र.क्र. ४३० /ज-३ दि.
४/१०/२००१
३) या कार्यालयाचे आदेश क्र. सी/कार्या-रडी/कुर्ला ते
ठाणे ५ वा.६ वा रेल्वे मार्ग दि. २०/३/२००३

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मध्य रेल्वे कुर्ला ते ठाणे दरम्यान ५ वा ६ वा रेल्वे मार्गासाठी खालीलप्रमाणे जमिन हस्तांतर करणेबाबत महानगर परिवहन परियोजना यांनी विनंती केली आहे.

| अ.क्र. | गांवाचे नांव | न.भू.क्र. | क्षेत्र / चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर - किरोळ | १००४ | ४२१.६० |
| २ | घाटकोपर- किरोळ | १००६ | ३५०८.१० |
| ३ | घाटकोपर - किरोळ | १२६१ | २२२५.६० |
| ४ | घाटकोपर | नाला | १६०.६० |
| ५ | हरियाली | १२० | ८०८.३० |
| ६ | भांडूप | १००३ | ६६१.०० |
| ७ | भांडूप | ५०८ | ५५०.९० |
| | | एकूण | ७९३८.१० |

A:kurla.doc C-5

Scanned by CamScanner

वरील सर्व मिळकत शासनस्तरावरून जमिन मंजुरीच्या आदेशास अधिन राहून या कार्यालयाचे दि. २७/२/२००१ च्या पत्रान्वये सदर जमिनीची तात्पुरती किंमत प्रति चौ.मी. रु. ८०००/- इतकी ठरविण्यात आली आहे. मागणी केलेले एकूण क्षेत्र ७९३८.१० चौ.मी. इतके होत असल्याने त्याची तात्पुरती कब्जेहक्काची किंमत रु. ६३५०४८'००/- इतकी रक्कम तात्काळ भरणेस कळविले होते. त्या अनुषंगाने आपण दि. ३०/३/२००१ च्या धनादेश क्र. ०४१९२६ अन्वये रु. ४,३८,२०,०००/- रुपये भरणा केली आहे.

सदर जमिनीचे सहाय्यक संचालक, नगर रचना वारसा व मुल्यनिर्धारण , जुने जकात घर यांचेकडून मुल्यांकन करण्यांत येऊन त्यांनी मौजे घाटकोपर - किरोळ सीटीएस नं. १००४ व १२६९ मौजे हरियाली सीटीएस नं. १२० व मौजे भांडूप सीटीएस नं. १००३ या मिळकतीचे मुल्यांकन प्रति चौ.मी. रु. ६०००/- इतके निश्चित केले आहे.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मंत्रालय यांचेकडील दि. ४/१०/२००१ चे ज्ञापन व या कार्यालयाचे आदेश दि. २०/३/२००२ अन्वये खालीलप्रमाणे जमिन मंजूर करण्यात आली आहे.

| अ.क्र. | गांव | न.भू.क्र. | क्षेत्र / चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर - किरोळ | १००४ | ४२१.६० |
| २ | घाटकोपर- किरोळ | १००४ | ३५०४.१० |
| ३ | घाटकोपर - किरोळ | १२६९ | २२३५.६० |
| ४ | घाटकोपर | नाला | १६०.६० |
| ५ | हरियाली | १२० | ४०४.३० |
| ६ | भांडूप | १००३ | ६६१.०० |
| | | एकूण | ७३८७.२० |

वरील जमिनीची कब्जेहक्काची किंमत सहाय्यक संचालक नगर रचना वारसा व मुल्यनिर्धारण यांनी निश्चित केलेल्या प्रति चौ.मी. रु. ६०००/- या दराने ४,४३,२३,२००/- इतकी होत आहे. आपण यापूर्वी रु. ४,३८,२०,०००/- भरणा केली आहे. उर्वरित रक्कम रु. ५०,३२००/- शासनास त्वरीत भरणा करावी.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रत :-
१) प्रकल्प संचालक,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे माहितीसाठी रवाना.
२) मा. प्रधान सचिव,
महसूल व वन विभाग मंत्रालय यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करित

A:\kurh.doc/C-5

Scanned by CamScanner